‘आयएक्स’ गैरव्यवहारप्रकरणी पाच गुन्ह्यांची एकत्र सुनावणी

नागपूर, मुंबई, पुणे, सातारा, सांगलीतील प्रकरणे एमपीआयडी न्यायालयात

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : फॉरेक्स व क्रिप्टो ट्रेडिंगमधून भरघोस परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याच्या आयएक्स ग्लोबल प्रकरणातील राज्यभरातील पाच गुन्ह्यांची एकत्र सुनावणी करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिले. विविध जिल्ह्यांतील व्यवहारांचे स्वरूप समान असून ते एकाच व्यवहारसाखळीचा भाग असल्याचे नमूद करत सर्व प्रकरणे मुंबईतील विशेष एमपीआयडी न्यायालयाकडे वर्ग करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले.

न्या. ऊर्मिला जोशी-फाळके आणि न्या. निवेदिता मेहता यांच्या खंडपीठाने विराज सुहास पाटील यांच्या याचिकेवर हा निर्णय दिला. याचिकाकर्त्यांवर नागपूरच्या नंदनवन पोलीस ठाण्यात तसेच मुंबई, पुणे, सांगली व सातारा येथेही गुन्हे दाखल आहेत. प्रकरणातील आरोपांनुसार, आरोपींनी फॉरेक्स ट्रेडिंग, क्रिप्टो ट्रेडिंग आणि ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्मच्या नावाखाली गुंतवणूकदारांना ८ टक्के नफ्याचे आश्वासन दिले. त्यासाठी सदस्यत्व शुल्क घेऊन मोठ्या प्रमाणात गुंतवणूक स्वीकारण्यात आली. सुरुवातीला काही रक्कम परत देण्यात आली; मात्र नंतर गुंतवणूकदारांना पैसे न मिळाल्याने विविध ठिकाणी फसवणुकीचे गुन्हे दाखल झाले.

वेगवेगळ्या न्यायालयांत स्वतंत्र खटले चालवल्यास सुनावणीला विलंब होईल, साक्षीदारांना वारंवार हजर राहावे लागेल आणि पुराव्यांची पुनरावृत्ती होईल, असा मुद्दा याचिकाकर्त्यांने मांडला. त्यावर न्यायालयानेही सहमती दर्शवत, संयुक्त सुनावणीमुळे न्यायालयीन वेळ वाचेल तसेच निष्पक्ष आणि जलद सुनावणी शक्य होईल, असे नमूद केले.

न्यायालयाने फौजदारी प्रक्रिया संहितेतील तरतुदींचा संदर्भ देत, समान उद्देश व सलग व्यवहारांच्या मालिकेतून घडलेले गुन्हे एकत्र चालविणे कायदेशीरदृष्ट्या शक्य असल्याचे स्पष्ट केले. तसेच एमपीआयडी कायदा हा ठेवीदारांच्या हितसंरक्षणासाठीचा विशेष कायदा असून अशा प्रकारचे आर्थिक गुन्हे ‘संघटित श्वेतपदरी गुन्हे’ असल्याचे निरीक्षणही नोंदवले.

‘टीटीईं’ना तिकीट तपासणीऐवजी गर्दी नियंत्रणाची जबाबदारी

अतिरिक्त कामे; कर्मचाऱ्यांत नाराजी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : प्रवाशांच्या सुरक्षिततेपासून तिकीट तपासणीपर्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडणाऱ्या तिकीट तपासणीस (टीटीई) कर्मचाऱ्यांना त्यांच्या मूळ कामांऐवजी गर्दी नियंत्रणासाठी तैनात करण्यात येत असल्याने त्यांच्यात नाराजी आहे.

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात सध्या अनेक लांब पल्ल्याच्या गाड्यांमध्ये आवश्यकतेपेक्षा कमी टीटीई कार्यरत आहेत. २४ डब्यांच्या गाड्यांमध्ये केवळ एक किंवा दोन टीटीईंवर संपूर्ण गाडीची जबाबदारी टाकली जाते. तिकीट तपासणी, प्रवाशांना आरक्षित जागा मिळवून देणे, प्रवाशांच्या तक्रारी सोडवणे आणि आपत्कालीन परिस्थितीत मदत करणे, अशी महत्त्वाची कामे त्यांच्याकडे असताना आता मात्र, नागपूर रेल्वेस्थानकावरील फलाटांवर होणारी गर्दी नियंत्रित करण्याचे काम टीटीईंना देण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. बांधकाम सुरू असलेल्या भागात प्रवाशांनी प्रवेश करू नये, यासाठी टीटीईंना उभे केले जाते. प्रत्यक्षात हे काम सुरक्षा रक्षकांकडून करणे अपेक्षित आहे.

रेल्वे कामगार संघटनांनीही या प्रकारावर आक्षेप घेतला आहे. एका बाजूला टीटीईंची मोठ्या प्रमाणावर कमतरता आहे. त्यामुळे गाड्यांमध्ये पुरेसे कर्मचारी दिले जात नाहीत. दुसऱ्या बाजूला उपलब्ध कर्मचाऱ्यांना मूळ कामांपासून दूर ठेवून सुरक्षा रक्षकांप्रमाणे कामे दिली जात आहेत. याचा थेट फटका प्रवाशांना बसत आहे, अशी टीका संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केली.

मेअखेरीस नागपूर काँग्रेस शहराध्यक्षपदावर निर्णयाची शक्यता

निरीक्षकांचा अहवाल दिल्लीत; केंद्रीय नेतृत्वाकडून हालचालींना वेग

लोकसत्ता प्रतिनिधी

नागपूर : नागपूर शहर काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी सुरू असलेल्या राजकीय हालचालींना अखेर मेअखेरीस पूर्णविराम मिळण्याची शक्यता आहे. काँग्रेसच्या संघटन सृजन अभियानांतर्गत नियुक्त करण्यात आलेल्या निरीक्षकांचा अहवाल दिल्लीतील केंद्रीय नेतृत्वाकडे सादर करण्यात आला असून, त्यानंतर शहर आणि ग्रामीण जिल्हाध्यक्षांच्या नियुक्तीबाबत अंतिम निर्णय घेण्याची प्रक्रिया वेगाने सुरू झाल्याची माहिती पक्षातील सूत्रांनी दिली.

नागपूर शहर आणि ग्रामीण काँग्रेसमध्ये गेल्या काही महिन्यांपासून नेतृत्वबदलाची चर्चा सुरू आहे. शहराध्यक्षपदासाठी अनेक इच्छुकांनी दावे केले असून विविध गटांकडून वेगवेगळी नावे पुढे रेटली जात आहेत. मात्र, अंतिम निर्णय हा केंद्रीय नेतृत्वाकडूनच होणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, नागपूर शहर आणि ग्रामीण जिल्हाध्यक्षपदासाठी प्रत्येकी सहा नावांचा प्रस्ताव २२ एप्रिल रोजी केंद्रीय समितीकडे पाठवण्यात आला होता. त्यानंतर २८ एप्रिलला दिल्ली येथे या नावांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. काँग्रेसचे सरचिटणीस के.सी. वेणुगोपाल, संघटन सृजन अभियानाचे प्रमुख वामसी रेड्डी, वरिष्ठ नेते मुकुल वासनिक तसेच समितीतील अन्य सदस्य या बैठकीला उपस्थित होते. महाराष्ट्रातील ज्या जिल्ह्यांमध्ये वेळेत अध्यक्षांची नियुक्ती होऊ शकली नाही, अशा जिल्ह्यांबाबत स्वतंत्र आढावा घेण्यात आला असून त्यामध्ये नागपूरचा समावेश होता.

दरम्यान, केरळमधील निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही संघटनात्मक निर्णय तात्पुरते प्रलंबित ठेवण्यात आल्याचे सांगितले जाते. राज्यातील सर्व शहर व जिल्हाध्यक्षांची नावे एकाच वेळी जाहीर करण्याचा पक्षश्रेष्ठींचा प्रयत्न असल्याचेही सूत्रांनी नमूद केले.

अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी केंद्रीय निरीक्षक अरुण यादव यांनी नुकताच नागपुरात सहा दिवसांचा दौरा करून कार्यकर्ते, माजी पदाधिकारी आणि इच्छुकांशी संवाद साधला. या चर्चांमध्ये गटबाजीबाबत नाराजी व्यक्त करण्यात आल्याचे समजते. शहराध्यक्षपदासाठी माजी नगरसेवक प्रफुल्ल गुडधे यांचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे.

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीमधील त्यांच्या सक्रिय भूमिकेमुळे काही केंद्रीय नेत्यांशी त्यांचे थेट संबंध असल्याचे मानले जाते. दुसरीकडे, विद्यमान अध्यक्ष विकास ठाकरे हे आपल्या समर्थकाला संधी मिळावी यासाठी प्रयत्नशील असल्याचे बोलले जात आहे.

फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड,
गोल्ड लोन - मेडिकल स्क्वेअर - नागपूर

सर्वसाधारण सूचना

फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड, गोल्ड लोन - मेडिकल स्क्वेअर - नागपूर शाखा याद्वारे आपल्या आदरणीय ग्राहकांना कळविण्यात येते की, उत्तम सेवा आणि कामकाजासाठी कंपनी आपले सध्याचे कार्यालय २९९, स्वप्निल अपार्टमेंट, फ्लॅट नं. १०३, लिनेनकिंग जवळ, अशोक चौक, उंटखाना रोड, मेडिकल स्क्वेअर, नागपूर, ४४००२४ येथून दुकान नं. जीएस-१ आणि जीएस-२, तळमजला, करुणा - शील भंडारे अपार्टमेंट, फ्लॉट नं. २१८, मौजा उंटखाना, कॉर्पोरेशन घर नं. १४६६, मौजा नागपूर, सिटी सर्व्हे नं. १३०, शीट नं. २९३, वॉर्ड नं. ११, चंदन नगर वकीलपेठ, मेडिकल रोड, नागपूर ४४००२४ या नवीन कार्यालयात स्थलांतरित करत आहे. कंपनी केवळ ०७ ऑगस्ट २०२६ पर्यंत सध्याच्या कार्यालयातून कार्यरत राहील आणि ०८ ऑगस्ट २०२६ पासून कंपनी नवीन कार्यालयातून कार्यरत राहील.

दिनांक : ०८/०५/२०२६
फेडबँक फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड,
गोल्ड लोन - मेडिकल स्क्वेअर - नागपूर शाखा

आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
IDFC FIRST Bank

(आधीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)।
सीआयएन: एल65110टीएन2014पीएलसी097792
नोंदणीकृत कार्यालय: - केआरएम टॉवर्स, 8 वा मजला, हॅरिंग्टन रोड, चेतपेट, चेन्नई- 600031.
टेलि.: +91 44 4564 4000 | फॅक्स: +91 44 4564 4022

सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 च्या कलम 13 (2) अंतर्गत सूचना

खालील कर्जदारांनी आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (आधीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)** यांच्याकडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदारांनी आणि सह-कर्जदारांनी त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित केलेली कर्जे घेतली आहेत. संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात ते अयशस्वी ठरले असल्याने आणि ते अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (आधीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** यांना त्यांच्याकडे देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून करारात्या दरानुसार आकारले जाईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जाचा प्रकार	कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे	कलम 13 (2) सूचना तारीख	कलम 13 (2) सूचनेनुसार थकबाकी रक्कम
1	98390592	गृह कर्ज	1. रामरतन समाधान लांजुळकर 2. अपर्णा रामरतन लांजुळकर	28.03.2026	भारतीय रुपये 2,22,162.33/-

मालमत्तेचा पत्ता: धारण मालमत्ता फ्लॉट नं. 08, फील्ड गट नं. 65, मालमत्ता क्षेत्रफळ 153.25 चौ. मीटर, येथे स्थित मौजे: आळसाना, तालुका: शेगाव, जिल्हा: बुलढाणा, महाराष्ट्र- 444203 यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि द्वारे **सीमाबद्ध:- पूर्व: 12 मीटर रुंद लेआउट रस्ता, पश्चिम: मोकळी जागा, उत्तर: 6 मीटर रुंद लेआउट रस्ता, दक्षिण: लेआउट प्लॉट नं. 7 बी.**

2	66186382	मालमत्तेवर कर्ज	1. सुदाम पांडुरंग निकम 2. कविता सुदाम निकम	14.03.2026	भारतीय रुपये 1,97,948.26/-

मालमत्तेचा पत्ता: मालमत्ता क्र. 6 मौजे पिंपळखुटा, प्लॉट क्षेत्रफळ 999 चौ. फूट आणि एकूण बिल्ट अप क्षेत्रफळ 864 चौ. फूट तळमजला, येथे स्थित हनुमान मंदिराजवळ, पिंपळखुटा, ता: बार्शीटाकळी, जिल्हा: अकोला, महाराष्ट्र- 444401 यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि द्वारे **सीमाबद्ध: पूर्व: लक्ष्मण ज्योतिराम बोबडे, पश्चिम: रस्ता, उत्तर: सदाशिव पांडुरंग निकम, दक्षिण: दिगंबर पांडुरंग निकम.**

तुम्हाला याद्वारे **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (आधीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** यांच्याकडे वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार, त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह रक्कम भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे, अन्यथा वर उल्लेख केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध, सरफेसी कायद्याच्या कलम 13 (4) आणि कलम 14 अंतर्गत, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (आधीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी)** थकित रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. याशिवाय, तुम्हाला सदर निश्चित कायद्याच्या कलम 13 (13) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

दिनांक: 08.05.2026
ठिकाण: अकोला, महाराष्ट्र

सही/- अधिकृत अधिकारी
आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड
(आधीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेड याम्ध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)

पावसामुळे विदर्भ एक्स्प्रेस प्रवाशांची गैरसोय

गाडी तासभर उशिराने रवाना

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

नागपूर : नागपूर रेल्वेस्थानकावरून मुंबईकडे रवाना होणारी विदर्भ एक्स्प्रेस गुरुवारी तब्बल तासभर उशिराने सुटल्याने शेकडो प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले. विशेषतः अजनी रेल्वेस्थानकावर सुरू असलेल्या विकासकामांमुळे फलाटावरील शेड हटवण्यात आल्याने मुसळधार पावसात प्रवाशांची अक्षरशः तारांबळ उडाली.

गोंदिया-नागपूर मार्गावरील विकासकामांमुळे ३ मे ते २३ मेदरम्यान विदर्भ एक्स्प्रेसचा गोंदिया-नागपूर दरम्यानचा प्रवास रद्द करण्यात आला आहे. त्यामुळे ही गाडी सध्या नागपूर स्थानकावरून सायंकाळी ५ वाजता मुंबईकडे रवाना होते. नागपूर, अजनी तसेच परिसरातील प्रवाशांसाठी विदर्भ एक्स्प्रेस ही मुंबई गाठण्यासाठी महत्त्वाची गाडी मानली जाते. त्यामुळे गाडी उशिराने सुटल्याचा फटका शेकडो प्रवाशांना बसला.

नियमित वेळापत्रकानुसार ही गाडी सायंकाळी ५.०५ वाजता अजनी स्थानकावर पोहोचते आणि दोन मिनिटांच्या थांब्यानंतर पुढे मार्गस्थ होते. मात्र गुरुवारी नागपूर स्थानकावरूनच गाडी नियोजित वेळेत सुटू शकली नाही. गाडी उशिराने येणार असल्याची माहिती प्रवाशांना वेळेत न मिळाल्याने अनेक जण नियोजित वेळेनुसार अजनी स्थानकावर पोहोचले. दरम्यान, सायंकाळी अचानक मुसळधार पावसाला सुरुवात झाल्याने प्रवाशांची गैरसोय झाली.

अजनी स्थानकावर सध्या सुरू असलेल्या विकासकामांमुळे अनेक ठिकाणी शेड काढण्यात आले आहेत. परिणामी फलाटावर उभे असलेल्या प्रवाशांना पावसापासून संरक्षण मिळू शकले नाही. पावसाळ्यापूर्वी किमान तात्पुरती शेडची व्यवस्था करायला हवी होती. विकासकामे सुरू असली तरी प्रवाशांच्या सुरक्षिततेकडे आणि सुविधांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही, अशी प्रतिक्रिया काही प्रवाशांनी व्यक्त केली.

हळदीच्या समारंभात तरुणांवर चाकूहल्ला

डीजेवर नाचताना धक्काबुक्की; तिघे गंभीर

लोकसत्ता खास प्रतिनिधी

नागपूर : यशोधरा नगर परिसरातील एका हळदी समारंभात बुधवारी रात्री किरकोळ वादातून हिंसाचार उफाळून आला. डीजेच्या तालावर नाचताना झालेल्या धक्काबुक्कीचे रूपांतर हाणामारीत झाले आणि त्यानंतर दोन तरुणांनी तिघांवर चाकूने हल्ला केला. या घटनेत तिन्ही तरुण गंभीर जखमी झाले असून परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

ही घटना यशोधरा नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कुंदनलाल गुप्ता नगर परिसरात घडली. एका तरुणाच्या हळदी समारंभानिमित्त मित्रमंडळी व नातेवाईक डीजेच्या संगीतावर नाचत होते. याच दरम्यान दोन गटांमध्ये किरकोळ धक्काबुक्की झाली. सुरुवातीला शाब्दिक बाचाबाची झाली; मात्र काही वेळातच वाद विकोपाला गेला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आर्यन धुर्वे आणि प्रज्वल रामटेके यांनी मिळून ऋतिक सांगोडे, यश नंदनवार आणि हर्ष नंदनवार यांच्यावर हल्ला केला. यावेळी आर्यन धुर्वे याने जवळील चाकू काढून ऋतिक सांगोडे याच्या हातावर व कोपरावर वार केले. वाद सोडवण्यासाठी पुढे आलेल्या हर्ष आणि यश नंदनवार यांनाही मारहाण करत चाकूने जखमी करण्यात आले. घटनेनंतर समारंभस्थळी एकच गोंधळ उडाला. उपस्थितांनी जखमींना तातडीने खासगी रुग्णालयात दाखल केले. तिघांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे.

खुनाच्या प्रयत्नाचा गुन्हा

याप्रकरणी यशोधरा नगर पोलिसांनी आरोपींविरुद्ध खुनाच्या प्रयत्नासह विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. हल्ल्यानंतर दोन्ही आरोपी फरार झाले असून त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथक नियुक्त केले आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात येत असून संबंधितांची चौकशी सुरू आहे.

‘बालकामगार प्रकरणात इतर संचालकांवरही गुन्हा दाखल करा’

नागपूर : बुटीबोरी औद्योगिक वसाहतीतील नारायणा प्रोसेस फूड प्रायव्हेट लिमिटेड या बिस्कीट कारखान्यातून नऊ बालकामगारांची सुटका झाल्यानंतर कंपनीच्या उर्वरित संचालकांवरही गुन्हा दाखल करण्याची मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय)ने केली आहे.

बाल संरक्षण पथकाने २७ एप्रिल २०२६ रोजी कारखान्यावर धाड टाकून नऊ बालकामगारांची सुटका केली होती. या प्रकरणात शशी नायर, वैभव मेहता, मनोज भगत आणि जुगल प्रधान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, कंपनीत चार संचालक असताना केवळ शशी नायर यांच्यावरच कारवाई झाली असून उर्वरित संचालकांवर गुन्हा दाखल करण्यात आलेला नसल्याचा आरोप आरपीआयचे नागपूर शहर महासचिव रजत महेशगवळी यांनी केला.

उर्वरित संचालकांवरही बालकामगार कायद्याअंतर्गत कारवाई करावी, अन्यथा ते साक्षीदारांवर दबाव टाकू शकतात, अशी भीती शिष्टमंडळाने व्यक्त केली.

रामदास कोरांम यांचे निधन

नागपूर : रामदास कोरांम यांचे गुरुवारी निधन झाले. ते ६९ वर्षांचे होते. ओबीसी युवा अधिकार मंचचे संयोजक उमेश कोरांम यांचे ते वडील होते. त्यांच्या पार्थिवावर भंडारा जिल्ह्यातील गुंथारा या गावी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, स्नुषा, नातवंडे आणि बराच मोठा आप्तपरिवार आहे.

HDB FINANCIAL SERVICES

नोंदणीकृत कार्यालय: रश्मिका, 2रा मजला, लॉ गार्डन रोड, नवरंगपुरा, अहमदाबाद, गुजरात, पिनकोड- 380009.
प्रादेशिक कार्यालय: 1ला मजला, विल्सन ब्रुकस, जुना नगरदास रोड, आंबोली सबवेजवळ, अंधेरी (पूर्व), मुंबई 400069 आणि महाराष्ट्र, तेलंगणा आणि छत्तीसगडमधील त्याच्या विविध शाखा.

सरफेसी कायदा, 2002 च्या कलम 13(2) अंतर्गत मागणी सूचना

तुम्ही, खाली नमूद केलेले कर्जदार, सह-कर्जदार आणि जामीनदार, तुमच्या स्थावर मालमत्ता (सिक्युरिटीज) गहाण ठेवून एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड यांच्याकडून कर्ज सुविधा घेतली आहे, तुम्ही तुमची आर्थिक शिस्त राखली नाही आणि त्याची परतफेड करण्यात कसूर केली आहे. तुमच्या डिफॉल्ट्सच्या परिणामी, तुमची कर्जे नॉन-परफॉर्मिंग मालमत्ता म्हणून वर्गीकृत करण्यात आली होती तुम्ही कर्जाची परतफेड करण्यासाठी सिक्युरिटीजच्या संदर्भात तयार केलेल्या अंतर्निहित सिक्युरिटी व्याजासह सांगितलेल्या कर्जाचा लाभ घ्याल. एचडीबीएफएस यांना आता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (कायदा) च्या कलम 13(2) अंतर्गत जारी केलेल्या डिमांड नोटीसच्या थकबाकी वसूल करण्याचा अधिकार आहे, ज्याचा मजकूर येथे सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, 2002 च्या नियम 3(1) सहवाचता निर्देशित कायद्याच्या कलम 13(2) यानुसार आणि तुमच्यावर पर्यायी सेवेद्वारे प्रकाशित केली जात आहे. कर्जदार, सह-कर्जदार, जामीनदार, कर्जे, सिक्युरिटीज, थकबाकी, कलम 13(2) अंतर्गत पाठवलेली मागणी सूचना आणि त्याअंतर्गत दावा केलेली रक्कम यांचे तपशील खाली दिले आहेत:-

1	**1. कर्जदार आणि सह-कर्जदार: 1. कुमार ट्रेडिंग कंपनी दुकान** क्र. एम 2, खत्री मार्केट अमरावती अमरावती- 444601 महाराष्ट्र, **2. लाजवंती गुरुदासमल वासवानी** छत्री तलाव रोड, सिंधू नगर, अमरावती रुख्मिणी नगर, अमरावती- 444606 महाराष्ट्र, 3. नानक गुरुदासमल वासवानी छत्री तलाव रोड सिंधू नगर अमरावती, रुख्मिणी नगर अमरावती- 444606 महाराष्ट्र, **4. गुरुदासमल जीवनमल वासवानी** छत्री तलाव रोड सिंधू नगर अमरावती, रुख्मिणी नगर अमरावती- 444606 महाराष्ट्र, **2) कर्ज खाते क्रमांक:-** 5463457. **3) कर्जाची रक्कम भारतीय रुपयांमध्ये:** रु. 2428603/- (रुपये चोवीस लाख अठ्ठावीस हजार सहाशे तीन फक्त). **4) सुरक्षेचे सविस्तर वर्णन:** गहाण ठेवलेली मालमत्ता:- धारण मालमत्ता लेआउट प्लॉट क्र. 39 चा पूर्वेकडील भाग उत्तर-दक्षिण विभागणी मोजमापे 867 चौ. फूट, क्षेत्र सर्वेक्षण क्र. 65, मौजा-राजपेठ, प्रदेश- बडनेरा, आणि त्यावरील बांधकाम, अमरावती महानगरपालिका हद्दीमधील यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, द्वारे सीमाबद्ध:- उत्तर - सॉन्डिस लेन, दक्षिण - रस्ता, पूर्व- रस्ता, पश्चिम- सदर या प्लॉटचा उर्वरित भाग. **5) मागणी सूचना दिनांक:-** 23.04.2026. **6) एकूण देय थकबाकी रक्कम भारतीय रुपयांमध्ये:** रु. 13,04,425.13/- (रुपये तेरा लाख चार हजार चारशे पंचवीस आणि तेरा पैसे फक्त) दि. 23.04.2026 रोजीनुसार आणि प्रत्यक्ष वसुली होईपर्यंतचे भविष्यातील करारानुसार व्याज, तसेच अनुषंगिक खर्च, शुल्क आणि आकारणी, इत्यादी.
2.	**1. कर्जदार आणि सह-कर्जदार: 1. सागर मार्केटिंग सागर मार्केटिंग,** दुकान क्र. 15, 16, 17, 18 सिटीलैंड कॉम्प्लेक्स नांदगाव पेठ अमरावती 444601 महाराष्ट्र **2. मीना महेश हरवानी दरोगा** प्लॉट बर्फाच्या कारखान्याजवळ राजापेठ अमरावती - 444606 महाराष्ट्र, **3. महेश ठाकूरदासजी हरवानी दरोगा** प्लॉट बर्फाच्या कारखान्याजवळ राजापेठ अमरावती - 444606 महाराष्ट्र, **4. सागर महेश हरवानी दरोगा** प्लॉट बर्फ कारखान्याजवळ, राजापेठ, अमरावती - 444606 महाराष्ट्र, **2) कर्ज खाते क्रमांक:** 4317739. **3) कर्जाची रक्कम भारतीय रुपयांमध्ये:** रु. 20000000/- (रुपये दोन कोटी फक्त). **4) सुरक्षेचे सविस्तर वर्णन:** गहाण ठेवलेली मालमत्ता:- प्लॉट क्र. 798, ब्लॉक क्र. 0-15, 0-16, 0-17, 0-18, विंग, सिटी लैंड कॉम्प्लेक्स, सेक्टर-2, गट क्र. 77, क्षेत्र सर्वेक्षण क्र. 47/3, 47/2अ, गट क्र. 76, क्षेत्रफळ सर्वेक्षण क्र. 47/2, मौजा-बोरगाव, क्षेत्र सर्वेक्षण क्र. 458/1, 458/2, 459, 460/1, 460/1क, 460/2, 460/3, 461/2, 463/1-अ/2, 463/अ-/3, 463/1-क, 464/1, 464/2, 464/3, मौजा- नाडगाव पेठ, ता. आणि जि. अमरावती - 444901, द्वारे सीमाबद्ध: उत्तर-ब्लॉक क्र. 0-13 आणि 0-14, दक्षिण-ब्लॉक क्र. 0-19 आणि 0-20, पूर्व-रस्ता, पश्चिम-रस्ता. **5) मागणी सूचना दिनांक:-** 23.04.2026. **6) एकूण नियत रक्कम भारतीय रुपयांमध्ये: रु. 10,633,328.53/- (रुपये एक कोटी सहा लाख तेहतीस हजार तीनशे अठ्ठावीस आणि त्रेपन्न पैसे फक्त)** दि. 23.04.2026 रोजीनुसार आणि प्रत्यक्ष वसुली होईपर्यंतचे भविष्यातील करारानुसार व्याज, तसेच अनुषंगिक खर्च, शुल्क आणि आकारणी इत्यादी.
3	**1. कर्जदार आणि सह-कर्जदार: 1. कुणाल एंटरप्राय्झेस** एफएफ-8, गिरीश हाईट्स 4था मजला सदर 4था मजला सदर नागपूर- 440001 महाराष्ट्र आणि तसेच कारा रॉयल 604 6वा मजला, कैम्पटी रोड, मोहन नगर बहरत पेट्रोल पंपाजवळ, नागपूर- 440001, महाराष्ट्र, **2. दीपा उमाकांत मोडक** फ्लॅट क्र. 302 गिरीश हाईट्स भारत टॉकीजजवळ, नागपूर महाराष्ट्र-440001, **3. छाया गोपाळराव मोडक** फ्लॅट क्र. 302 गिरीश हायट्स कैम्पटी रोड सदर एलआयसी स्केअरजवळ नागपूर- 440001 महाराष्ट्र, **4. स्मिता उमाकांत मोडक** फ्लॅट क्र. 302 गिरीश हाईट्स भारत टॉकीजजवळ नागपूर महाराष्ट्र- 440001, **5. निशा उमाकांत मोडक** फ्लॅट क्र. 302 गिरीश हाईट्स भारत टॉकीजजवळ, नागपूर महाराष्ट्र- 440001, **6. गोपिका उमाकांत मोडक** फ्लॅट क्र. 302 गिरीश हाईट्स भारत टॉकीजजवळ, नागपूर महाराष्ट्र- 440001, **7. उमाकांत गोपाळराव मोडक** फ्लॅट क्र. 302 गिरीश हाईट्स भारत टॉकीजजवळ नागपूर महाराष्ट्र- 440001, **8. निशा उमाकांत मोडक** फ्लॅट क्र. 302 गिरीश हाईट्स कैम्पटी रोड, एलआयसी स्केअरजवळ नागपूर- 440001 महाराष्ट्र, **9. उमाकांत गोपाळराव मोडक** फ्लॅट क्र.302 गिरीश हायट्स कैम्पटी रोड एलआयसी स्केअरजवळ नागपूर- **2) कर्ज खाते क्रमांक:-** 2314389. **3) कर्जाची रक्कम भारतीय रुपयांमध्ये:** रु. 5,08,13,993/- (रुपये पाच कोटी आठ लाख तेरा हजार नऊशे त्र्याण्णव फक्त). **4) सुरक्षेचे सविस्तर वर्णन:** सिक्युरिटीज 1 चे परिशिष्ट "अमर विहार" आर.सी.सी. सुपरस्ट्रक्चर, ज्यामध्ये निवासी कुटुंब यूनिट क्र. एफ-1 समाविष्ट आहे, पहिला आणि दुसरा मजला मिळून डुप्लेक्स शैलीत बांधलेले, इमारत क्र. सी, सुपर बिल्ट अप एरिया 1915 चौ. फूट. (177.97 चौ. मीटर), 4.800% अविभाजित हिस्सा मोकळी जमीन 210 चौ. फूट. (19.51 चौ. मीटर) टेरेस 127 चौ. फूट. (11.80 चौ. मीटर), प्लॉट क्र. 5 आणि 6 मोजमापे 2569.026 चौ. मीटर. सी.एस. क्र. 17, शीट क्र. 422/10, केएच क्र. 6/2, 7/3, मौजा वांजारी. ता. आणि जि. नागपूर यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल. द्वारे सीमाबद्ध: उत्तर: 9.14 मीटर रस्ता, दक्षिण: मोकळी जागा, पूर्व: प्लॉट क्र. 4, पश्चिम: केएचची सीमा. सिक्युरिटीज 2 चे परिशिष्ट अमर विहार-1, फॅमिली युनिट क्र. एफ-2. पहिला मजला, इमारत क्र. सी, बिल्ट अप क्षेत्रफळ 168.40 चौ. मी. प्लॉट क्र. 5 आणि 6 मधील अविभाजित 4.564% हिस्सेदारीसह मोजमापे 2569.026 चौ. मी. केएच. क्र. 6/2, 7/3, सी.एस. क्र. 17, शीट क्र. 422/10, मौजा वांजारी ता. आणि जि. नागपूर यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, सीमाः उत्तरः 9.14 मीटर रस्ता, दक्षिणः मोकळी जागा, पूर्वः प्लॉट क्र. 4, पश्चिमः केएचची सीमा, सिक्युरिटीज 3 चे परिशिष्ट गिरीश हाइट्स, अपार्टमेंट क्र. 304, एकू